## महाराष्ट्र शासन

क्रमांक :- प्राशास्थ ३२१५/प्र.क्र.११६/एसएम-१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई
दिनांक :- २४ एप्रिल, २०१५

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,
पुणे

विषय:-प्राथमिक शाळेच्या स्थलांतरास परवानगीबाबत
श्री.श्री.रविशंकर विद्यामंदिर ट्रस्ट, पुणे संचलित श्री.श्री.रविशंकर मोर्शी या शाळेचे चिंचवड पुणे या कायम विना अनुदानित इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेच्या वडुसविले टाऊनशिप बोऱ्हाडेवाडी, मोर्शी येथे केलेल्या स्थलांतरास कार्योत्तर मान्यता देण्याबाबत

संदर्भ : आपले क्र.शिउसं/प्राथ-२/स्थलांतर/पुवि/२०१४-१५/५४३०/३२,
दि. १७ मार्च, २०१५ चे पत्र

उपरोक्त विषयाबाबत संदर्भीय पत्राचे कृपया अवलोकन करावे.

२. श्री.श्री.रविशंकर विद्यामंदिर ट्रस्ट, पुणे संचलित श्री.श्री.रविशंकर मोर्शी या इंग्रजी माध्यमाच्या कायम विना अनुदानित प्राथमिक शाळेचे, वडुसविले टाऊनशिप बोऱ्हाडेवाडी, मोर्शी येथे शासन मान्यतेशिवाय स्थलांतर करण्यात आले आहे. सदर संस्था विशेष मुलांच्या व गरीब शिक्षणासाठी प्रयत्न करीत आहे, तसेच स्थलांतरांसाठी पालकांनी केलेली विनंती विचारात घेऊन या शाळेच्या स्थलांतरास खालील अटींच्या अधीन राहून कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे :-

१) स्थलांतरीत प्राथमिक शाळेची कोणत्याही वर्गासाठी, कोणत्याही कारणास्तव सरासरी हजेरीची अट शिथिल केली जाणार नाही.

२) स्थलांतरास सर्व शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचारी यांची सहमती असावी. तसेच सर्व पात्रताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना स्थलांतरित केलेल्या प्राथमिक शाळेच्या ठिकाणी सामावून घेणे आवश्यक राहील.

३) शासनाचे वेळोवेळी निर्गमित होणारे सर्व नियमांचे पालन करणे संस्थेच्या प्राथमिक शाळेस बंधनकारक राहील.

४) स्थलांतरीत ठिकाणी आरटीई ॲक्ट, २००९ नुसार प्राथमिक शाळेसाठी आवश्यक जागा, फर्निचर, ग्रंथालय, खेळाचे मैदान, शैक्षणिक व भौतिक सुविधांची पूर्तता संस्थेने करणे आवश्यक राहील.

याबाबत संस्थेच्या लेटरहेडवर शपथपत्र घेण्यात यावे. तसेच याबाबत शिक्षणाधिकारी यांनी खात्री करून घेणे आवश्यक राहील.

५) श्री.श्री.रविशंकर विद्यामंदिर ट्रस्ट, पुणे संचलित श्री.श्री.रविशंकर मोर्शी या इंग्रजी माध्यमाच्या कायम विना अनुदानित प्राथमिक शाळेस नियमानुसार मान्य पदावरील आरक्षणानुसार नियुक्त केलेले, क्षेत्रिय अधिकाऱ्यांची मान्यता असलेले सर्व अर्हता प्राप्त शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना स्थलांतरित शाळेत सामावून घेण्यात यावे व तसे हमीपत्र संस्थेकडून रू.१००/- च्या बंधपत्रावर नोटोराईज्ड करून घ्यावे.

६) स्थलांतरीत प्राथमिक शाळेच्या बाबतीत शासन परवानगीच्या व मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.

७) प्रस्तावित ठिकाणी पटसंख्येअभावी शिक्षक अतिरिक्त झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील.

८) स्थलांतरीत प्राथमिक शाळा मुळ ठिकाणी अनुदानाच्या ज्या तत्वावर होती, त्याच तत्वावर स्थलांतरीत ठिकाणी मंजूरी देण्यात यावी.

९) सदरहू स्थलांतरासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी वा आक्षेप झाल्यास स्थलांतरणास देण्यात आलेली मंजूरी तात्काळ रद्द करण्याची कार्यवाही शासन स्तरावरून करण्यात येईल.

१०) शाळा स्थलांतरास शासनाची पूर्वमान्यता आवश्यक आहे, ही बाब संस्थेच्या निदर्शनास आणून याबाबत यापुढे दक्षता घेण्याचे स्पष्ट करण्यात यावे.

३. सदरहू संस्थेच्या प्राथमिक शाळेच्या स्थलांतरास कार्योत्तर मान्यता देण्याबाबत आवश्यक पुढील कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास कळविण्यात यावे.

स्वा.म.नानल

(स्वा.म.नानल)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे

प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८

अध्यक्ष / सचिव, श्री.श्री.रविशंकर विद्यामंदिर ट्रस्ट, १, दामोदर भवन, ७/ए, ढोले पाटील रोड, पुणे- ४११ ००१